**नि.क्र.०१/क** संक्षीप्त फौजदारी खटला क्रमांक २८०/२०२५
राणाप्रताप विरूध्द अंकुश

# <u>फौजदारी प्रक्रिया संहिता, १९७३ चे कलम २०० अनुसार फिर्यादीची शपथेवर पडताळणी</u>.

**<u>मी शपथपुर्वक निवेदन करतो की</u>** :

माझे नाव :– सागर विलास लाळे.

वय : ३८ वर्षे, व्यवसाय : व्यापार .

राहणार :– दत्त नगर, निलंगा ता. निलंगा जिल्हा लातूर.

**<u>फिर्यादीतर्फे विधीज्ञ श्री. एच. व्ही गायकवाड हजर</u> :–**

०१. फिर्यादी आणि आरोपी यांना मी ओळखतो. त्यांच्यामधील खरेदीपत्राची माहिती मला दिनांक ०३/०१/२०२५ रोजी समजली. दिनांक १७/११/२०२२ रोजी खोटे कागदपत्र वापरुन खरेदीपत्र केले होते. भुमीअभीलेख कार्यालयातील गुंठेवारीचा खोटा नकाशा वापरुन ते खरेदीपत्र केले होते. तो नकाशा भुमी अभिलेख कार्यालयातील नव्हता. दिनांक ०३/०१/२०२५ रोजी मी, शाहुबाई वाबळे आणि फिर्यादी आरोपीकडे सायंकाळी ०७.०० वाजता त्या खरेदीपत्राबाबत विचारणा करण्या करीता दापका येथे गेलो असता, आरोपीने फिर्यादीला शिवीगाळ केली. त्याच्या गच्चीला धरुन त्याला टिकुराने व लाथाबुक्क्याने पाठीवरती मारहाण केली. त्याच्या आईला त्यांनी अर्वाच्य शिवीगाळ केली. त्यांनी फिर्यादीला आत्ता वाचलास परत तुला

**नि.क्र.०१/क** संक्षीप्त फौजदारी खटला क्रमांक २८०/२०२५

राणाप्रताप विरूध्द अंकुश

ठार मारेण अशी धमकी दिली. मी आणि मुजीब दफेदार यांनी सोडवासोडव केली. त्या घटनेची फिर्याद देण्यासाठी आम्ही निलंगा पोलीस ठाणे येथे गेलो. आरोपी दापका येथील उपसरपंच आहे. पोलीसांनी फिर्यादीची तक्रार घेतली नाही. त्यानंतर पोलिस अधिक्षक, लातूर यांच्याकडे आम्ही अर्ज करण्यासाठी गेलो होतो. अर्ज केला होता. परंतु पोलीसांनी कार्यवाही केली नाही. आरोपीस त्यांनी केलेल्या गुन्हयाबाबत शिक्षा व्हावी हि विनंती.

..............................

(सागर विलास लाळे)

साक्षीदाराची सही

**श्रवणोत्तर स्वीकृत.**

Digitally signed by APARNA SHIVAJI GUNJAVATE
Date: 2026.04.15 16:48:19 +0530

(**श्रीमती.ए.एस.गुंजवटे**)

दिनांक–१५/०४/२०२६.

प्रथमवर्ग न्यायदंडाधिकारी, न्यायालय क्र.१,
निलंगा